निर्णय क्र. मविनिआ/माअअ/२०२२/अपील/०९/२०२२/०५७७ दिनांक-२१.११.२०२२

| | |
|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | :१२.०९.२०२२ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | :१६.०९.२०२२ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | :२६.०९.२०२२ |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | :२१.११.२०२२ |

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

**अपील क्र. ०९/२०२२**

**अपीलकर्ता:** श्री. नागेश किसनराव निमकर

**विरुदध**

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**अपीलाचे तथ्य :-**

१) अपीलकर्ता यांनी दिनांक १२.०९.२०२२ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक १६.०९.२०२२ रोजी प्राप्त झाला. अपीलार्थी यांच्या दिनांक १२.०९.२०२२ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत दाखल केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी समाधानकारक माहिती न पुरविल्यामुळे अपीलार्थी यांनी दिनांक २२.०९.२०२२ रोजी वरील अपील दाखल केले. (प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक २६.०९.२०२२ रोजी प्राप्त झाले.)

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक २७.०९.२०२२ रोजी नोटिस पाठवून दिनांक १२.१०.२०२२ रोजी आयोजीत केलेली सुनावणी प्रथम अपीलीय अधिकारी यांची प्रकृती ठिक नसल्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात येवून पुन:श्च सूनावणीस दिनांक १९.१०.२०२२ रोजी आयोजीत केली. सदर सुनावणीच्या एक दिवस आधी म्हणजेच दिनांक १८.१०.२०२२ रोजी अपीलार्थी स्वत: कार्यालयात येवून माहिती अधिकार अर्जात मागीतलेली माहिती मिळालेली असून सदर दिनांक २२.०९.२०२२ रोजी दाखल केलले प्रथम

अपील मागे घेत असल्याची विनंती केली, त्यानुषंगाने अपीलार्थी यांची विनंती मान्य करून अपीलार्थी यांनी लेखी स्वरूपात लिहून दिले आहे, ते खालील प्रमाणे-

*"मला माहिती मिळाली, माहिती अधिकारी दि. १८/१०/२२ रोजी माहिती उपलब्ध करून दिली, दिलेली माहिती समाधानकारक आहे, म्हणून अपील मागे घेत आहे."*

**३) अपिलातील दस्तऐवज व निवेदनावरुन अपिलातील मुददे खालील प्रमाणे आहेत -**

**माागितलेली माहिती:-**

i. मुंबई महानगरात व मुंबई उपनगरात विजवितरण करण्यासाठी कुठल्या कंपन्यांना परवाना दिलेला आहे, त्या कंपन्यांची नावासह माहिती देणे.

ii. एकाच महानगरपालिका क्षेत्रामध्ये वेगवेगळया कंपन्या विजवितरण करण्यासाठी परवाना देण्याचे कायदेशीर अद्यादेश असल्यास त्याची कागदोपत्री माहिती देणे.

iii. जनतेला जर एखादी कंपनी स्वस्त दरात विज वितरण करण्यासाठी तयार असेल तर त्याची मागणी त्या महानगरपालिकेतील अथवा त्या तालुक्यातील जनता कुठल्या कायदान्वये विजवितरणासाठी मागणी करू शकते. एकाच महानगरपालिकेच्या हद्दीत दोन कंपन्यांना विजवितरणासाठी परवाना देण्याची तरतुद असल्यास माहिती देणे.

iv. भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका व उर्वरीत भिवंडी ग्रामिण तालुका या हद्दीत महावितरण विज वितरणाचा काम करत आहे तर एखादी कंपनी आम्हांला स्वस्त दरात विज वितरण करत असेल तर त्या कंपनीची भिवंडी विभागात विज वितरणासाठी परवाना देण्याचे तरतुद आपल्या विभागामार्फत असल्यास त्याबाबत माहिती देणे.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-**

माहिती अधिकार अर्ज दिनांक १२.०९.२०२२ मध्ये मागीतलेल्या माहितीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर-

**वरिल मुद्दा क्रमांक (i) ला दिलेले उत्तर :-**

मुंबई महानगर व मुंबई उपनगरात मध्ये विज वितरण करण्यासाठी पुढील कंपन्या प्राधिकृत आहेत :-

a) अदानी इलेक्ट्रिसीटी मुंबई लि.

b) टाटा पॉवर कंपनी लि.

c) बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि वाहतुक उपक्रम

d) महाराष्ट्र विज वितरण कंपनी लि.(भांडूप, मुलुंड, आदि.)

e) तसेच नवी मुंबई व पनवेल विभागात कांही SEZ Developers नां त्यांच्या SEZ मध्ये विज वितरण करण्यासाठी प्राधिकृत केले आहे.

याबाबतची माहिती आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर उतरवून घेण्याकरिता उपलब्ध करण्यात आलेली आहे. त्यासाठी संकेतस्थळावरील (Licences Issued या tab) वरती पहावे.

**<u>वरिल मुद्दा क्रमांक (ii), (iii) व (iv) ला दिलेले उत्तर</u> :-**

सदर माहितीसाठी विद्युत अधिनियम, २००३ मधील Part IV - Licensing, Section १२ ते Section २४ पहावे.
सदर अधिनियम आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर उतरवून घेण्याकरिता उपलब्ध आहे.

**<u>प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-</u>**

*माहिती देण्यात आलेली नाही- आमचे माहिती अधिकार अर्ज आपल्या विभागास दिनांक ०९.०९.२०२२ रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे सचिव यांना दिला होता, परंतु सदर माहिती अधिकाराखाली आपल्या विभागाने मुद्दा क्र.१ ची माहिती व्यवस्थित दिलेली आहे, परंतू मुद्दा क्र.२, ३ व ४ बाबत आपन संकेतस्थळाला भेट देण्यास सांगितले, परंतू संकेतस्थळावरती आम्हांला काही समजत नसल्याने आपल्या विभागाने मुद्दा क्र.१, २ व ३ ची माहिती कागदोपत्री द्यावी तसेच मागितलेल्या माहितीचे योग्यरित्या समाधान व्हावे, म्हणून हे पहिले अपिल आपल्याकडे दाखल करीत आहे.*

**<u>अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे :-</u>**

आपीलार्थी यांना माहिती मिळाल्यामुळे सुनावणीच्या एक दिवस आधी म्हणजेच दिनांक १८.१०.२०२२ रोजी स्वत: कार्यालयात येवून प्रथम अपील मागे घेत असल्याची विनंती केली, त्यानुषंगाने अपीलाच्या गुणवत्तेवर / व उपस्थित मुद्यांवर अपील निकाली न काढता सदर अपील हि अपील मागे घेतल्यामुळे खारीज करून निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

<u>निर्णय</u>

आपीलार्थी यांनी प्रथम अपील मागे घेतल्याने सदर अपील खारीज करून निकाली काढण्यात येत आहे.

**(अनिलकुमार उके)**
**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**

प्रति,
श्री. नागेश किसनराव निमकर,
घर नं. १३७६/१, सुंदरम अपार्टमेंट,
चौधरी कंम्पाउंड, कामतघर,भिवंडी, जि. ठाणे-४२१३०८

**(अनिलकुमार उके)**
**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**